|| श्री ||
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

* सुविचार *
महान माणसांची मने साधी असतात.

अहिल्यानगर | बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३२३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# महावितरण कंपनीची आर्थिक पुनर्रचना

## महावितरणचा आयपीओ येणार । कृषी वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र वितरण कंपनी

**मुंबई । वीरभूमी –** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) कंपनीचे औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती व इतर सर्व बिगर कृषी ग्राहकांसाठीची वितरण संस्था आणि कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एमएसईबी सोलार ग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) असे विभाजन करून दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

बिगर कृषी वितरण क्षेत्रातील महावितरण या कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. महावितरण कंपनीने विविध पायाभूत योजनांसाठी घेतलेल्या सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी आहे. या कर्ज दायित्वापोटी महाराष्ट्र शासन पंधरा वर्षे मुदतीचे दीर्घकालिन सरकारी रोखे जारी करणार आहे. यामुळे महावितरणवरील कर्जाचा बोजा कमी होऊन आर्थिक स्थिती आणखी चांगली होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील ग्राहकांना ऊर्जा सुरक्षा आणि गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणची आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी ही पुनर्रचना करण्यात येणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील बाजारपेठीय संधीचा लाभ घेण्यासाठी अशा दोन कंपन्यांची निर्मिती केली जाईल. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शिफारशी तसेच मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना २.० च्या धोरणात्मक उद्दिष्टानुसार एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड ही कंपनी ३१ मे २०२३ रोजी स्थापन करण्यात आली आहे. या कंपनीच्या



माध्यमातून शेतीसाठीच्या वीज पुरवठ्याचे नियोजन आणि सौर ऊर्जेवर आधारित कृषि ऊर्जा प्रणाली विकसित करण्यासाठी संस्थात्मक आधारभूत रचना निर्माण होणार आहे.

महावितरणाच्या आर्थिक पुनर्रचनेनंतर राज्यातील वीज वितरण व्यवसाय दोन स्वतंत्र कंपन्याकडून केले जाईल. यात कृषी वितरण संस्था म्हणजेच एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड– एमसएएपीएल कंपनी केवळ कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देईल. तर अकृषिक वितरण संस्था म्हणजेच महावितरण औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती आणि इतर बिगर कृषी ग्राहकांना सेवा पुरवेल. या दोन्ही कंपन्यांचा वीज विक्री, महसूल व खर्चाचा तपशील यांचा लेखा–जोखा स्वतंत्रपणे मांडला जाईल. विभाजनानंतर सहा ते नऊ महिन्यांच्या कालावधीत महावितरण आयपीओ आणला जाईल. त्यासाठी सेबीकडे आवश्यक त्या मंजुरी व वित्तीय प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. महावितरणचा आयपीओ – नवीन समभाग (फ्रेश इश्यू) आणि शासनाकडील समभाग विक्री (ऑफर फॉर सेल) याद्वारे आणला जाईल. यामुळे महावितरणाला विस्तारासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होईल. यातून स्मार्ट मिटरिंग व डीजिटल वितरण प्रणाली, ऊर्जा संक्रमणाशी संबंधित गुंतवणूक, वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण हे करता येणार आहे.

नवीन स्थापन होणाऱ्या कृषी वितरण कंपनी एमएसएपीएलला सुरूवातीचे भांडवल म्हणून अडीच हजार कोटी रुपयांचे उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या दोन्ही कंपन्यांच्या स्थापनेमुळे कृषी तसेच औद्योगिक, घरगुती ग्राहकांना स्थिर व अखंडित वीज पुरवठा उपलब्ध करून देता येणार आहे. विशेषत: शेतकऱ्यांना दिवसा व अखंडित वीज पुरवठा मिळणार आहे. कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी आवश्यक सौर ऊर्जिकरणाला चालना मिळणार आहे. औद्योगिक ग्राहकांना स्थिर व अखंडित वीजपुरवठा, दरवाढीवरील ताण कमी होणार, हरित ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहन मिळेल. तसेच घरगुती ग्राहकांसाठी वीज दरांमध्ये अधिक स्थिरता येईल, सेवा गुणवत्तेमध्ये सुधारणा, डीजिटल बिलिंग व ग्राहक सेवा अधिक सक्षम होणार आहे.

## SPOT NEWS

### आजपासून एअर इंडियाचा प्रवास महागणार

**नवी दिल्ली –** एअर इंडियाने इंधनावरचा सरचार्ज वाढवला आहे. त्यामुळे एअर इंडियाच्या विमानांची तिकिटे महागणार आहे स्पष्ट आहेत. नवे दर ८ एप्रिलपासून म्हणजेच रात्री १२ वाजल्यानंतर वाढणार आहेत. एअर इंडिया एक्स्प्रेसतर्फे ज्या विमानांचे उड्डाण होते. त्या विमानांच्या तिकिटांचे दरही वाढणार आहेत. बांगलादेश, जपान, हाँगकाँग आणि दक्षिण कोरिया येथील उड्डाणासांठी विमानाच्या तिकिट दरांमध्ये एअर इंडियाने फ्युएल चार्ज वाढवला आहे. त्यामुळे विमानचे तिकिट महागले आहे. ८ एप्रिलपासून नवे दर लागू होतील. त्यामुळे आता एअर इंडिया किंवा एअर इंडिया एक्स्प्रेस या विमानांनी प्रवास करायचा असेल तर तुमच्या खिशाला अधिकची झळ बसणार आहे यात शंकाच नाही. नवीन दर (देशांतर्गत विमान प्रवासासाठी)– ० ते ५०० किमी : २९९ रु, ५०१ ते १,००० किमी : ३९९ रु १,००१ ते १,५०० किमी: ५४९ रु १,५०१ ते २,००० किमी: ७४९ रु २,००० किमी पेक्षा जास्त: ८९९ रु अशी ही दरवाढ असणार आहे.

### देशभरात मुसळधार पावसाचा इशारा

**पुणे –** मार्चमधील गोंधळात टाकणाऱ्या हवामानानंतर एप्रिलमध्येही देशातील अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. गेल्या महिन्यात प्रामुख्याने उत्तर भारतात हवामानाचे विचित्र स्वरूप पाहायला मिळाले. जिथे उंच डोंगराळ प्रदेशात बर्फवृष्टी आणि मैदानी भागात अवकाळी पावसासह गारपिटीने तडाखा दिला. यादरम्यान भारतीय हवामान खात्याने संपूर्ण देशभरात वादळी पावसाचा इशारा दिला आहे. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळणार असला तरीही त्याचा मान्सूनशी थेट संबंध नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. एकामागून एक येणाऱ्या तीव्र पश्चिमी विक्षोभांमुळे हवामानात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. स्थानिक पातळीवर तयार झालेले बाष्प आणि वातावरणातील इतर बदलांच्या परस्पर संबंधामुळे देशभरात अवकाळी पाऊस पडत असल्याचे हवामान तज्ज्ञांचे मत आहे.

# एल निनोचा प्रभाव, यंदा पाऊस कमी पडणार!

## स्कायमेटचा अंदाज, आगामी मान्सूनबाबत चिंता वाढविणारे भाकित

**नवी दिल्ली । वीरभूमी –** एल निनोचा परिणाम यंदा मान्सूनवर होणार असल्याचा अंदाज स्कायमेट या खासगी हवामान संस्थेने वर्तवला आहे. २०२६ मध्ये सरासरीपेक्षा कमी मान्सूनचा अंदाज स्कायमेटने वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या ४ महिन्यांच्या कालावधीत मान्सून पर्जन्यमान सरासरीच्या ९४ टक्के असू शकते, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हंगामाच्या दुसऱ्या सहामाहीत एल निनोची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

जून महिन्यात मान्सून तुलनेने स्थिर राहण्याची शक्यता असली, तरी जुलै ते सप्टेंबर या कालावधीत पावसाची तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे. देशातील मध्य आणि उत्तर–पश्चिम भागांमध्ये पावसाची कमतरता जाणवू शकते, ज्याचा शेती आणि जलस्रोतांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. भारतीय हवामान विभाग आता पुढील आठवड्यात मान्सून हंगामासाठीचा आपला पहिला अंदाज जाहीर करण्याची शक्यता आहे.

भारतात २०२६ मध्ये मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज खाजगी हवामान संस्था स्कायमेटने आज वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या पावसाळी हंगामाच्या उत्तरार्धात एल निनोचा या हवामान स्थितीमुळे पावसाचे प्रमाण घटण्याची शक्यता असल्याचे स्कायमेटने म्हटले आहे. त्यामुळे खरीप पिकांना त्याची मोठी झळ पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

स्कायमेटच्या अंदाजानुसार ४ महिन्यांच्या या कालावधीत दीर्घकालीन सरासरीच्या (८६८.६ मिमी) ९४ टक्के पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभाग पुढील आठवड्यात मान्सूनचा आपला पहिला अधिकृत अंदाज जाहीर करण्याची शक्यता आहे.

# ४० माओवाद्यांसह ‘पीएलजीए’च्या जहाल कमांडरने टेकले गुडघे

**गडचिरोली । वीरभूमी –** तेलंगणा व छत्तीसगड सीमावर्ती भागात गेल्या अनेक वर्षांपासून दहशतीचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या नक्षलवादी चळवळीचा पाया आता पूर्णपणे हादरला आहे. नक्षल्यांच्या पीएलजीए (पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी) चा जहाल कमांडर सोडी केशालू ऊर्फ मल्ला याने आपल्या ४० सहकाऱ्यांसह पोलिसांसमोर ७ एप्रिल रोजी शरणागती पत्करली. यामुळे माओवाद्यांचे बटालियन विखुरले असून सीमावर्ती भागात हिंसक चळवळीला ओहोटी लागल्याचे सूत्रांनी सांगितले.

शरण आलेल्या या नक्षल्यांनी केवळ आत्मसमर्पण केले नाही, तर त्यांच्याकडील एके–४७, इन्सास आणि एसएलआर सारख्या आधुनिक स्वयंचलित शस्त्रांचा साठाही पोलिसांकडे सुपूर्द केला. सध्या केशालू हा संघटनेतील सर्वात प्रभावी मोहरा मानला जात होता. कर्रेगुट्टा टेकड्यांच्या दुर्गम भागात वावरणारा हा जहाल कमांडर २५ हून अधिक माओवादी तुकड्यांचे नेतृत्व करत होता. तो आता मुख्य प्रवाहात सामील झाल्याने माओवाद्यांच्या गोटात खळबळ उडाली आहे.

वर्षाच्या सुरुवातीला २ जानेवारी रोजी पीएलजीए बटालियन–१ चा कमांडर बारसा देवा ऊर्फ देवन्ना याने शस्त्र म्यान करुन गुडघे टेकले होते. त्यानंतर २२ फेब्रुवारी रोजी नक्षलवादी चळवळीत ४० वर्षे घालवलेला आणि पॉलिटब्युरोचा सर्वोच्च नेता ६२ वर्षीय थिप्पिरी तिरुपती ऊर्फ देवजी याने पोलिस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांच्यासमोर आत्मसमर्पण केले. यावेळी त्याच्यासोबत वरिष्ठ नेता मल्ला राजी रेड्डीसारखे महत्त्वाचे नेते होते.

# ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ राज्यव्यापी अभियानाचा शुभारंभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते शुभारंभ । उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यासह मंत्रिमंडळाची उपस्थिती

**मुंबई । वीरभूमी –** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता–बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत,



जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

# SPOT NEWS

## डॉ. अतुल भांबळ यांना अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
शहरातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अतुल भांबळ यांना अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून हॉस्पिटल मॅनेजमेंट या विषयात मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. गोवा येथे पार पडलेल्या पदवीदान समारंभात गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते डॉ. भांबळ यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे डायरेक्टर अनिल कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. अतुल भांबळ हे अहिल्यानगर जिल्ह्यातील वांबोरी गावचे सुपुत्र असून, अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून त्यांनी आपली वाटचाल सुरू केली. प्रचंड मेहनत, चिकाटी आणि सेवाभावी वृत्तीच्या जोरावर त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हजारो उमेदवारांमधून निवड होऊन मिळवलेला हा सन्मान त्यांच्या गुणवत्तेची आणि कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे. विशेष म्हणजे, डॉ. भांबळ हे अर्धांगवायू (पॅरालिसिस) ग्रस्त रुग्णांसाठी मोफत उपचार देण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. 'डॉक्टर कीट' या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील हजारो गरजू रुग्णांना निःस्वार्थ सेवा पुरवली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक रुग्णांना नवसंजीवनी मिळाली आहे.

## मोफत नेत्रतपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
शहरातील दिल्ली गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शमी गणपती मंदिरासमोर, कानूर पठार पतसंस्था येथे सुरू असलेल्या या शिबिरात एकूण २५० रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ७० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी मोफत निवड करण्यात आली आहे. पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडत असून, डॉ. आनंद किशोर बोज्जा (नेत्रचिकित्सक) यांनी स्वतः रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य उपचाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. बोज्जा म्हणाले की, पूर्वी मोफत शिबिरांबाबत लोकांमध्ये शंका आणि भीती होती. शस्त्रक्रिया योग्य होणार नाही, अशी भावना अनेकांच्या मनात होती. मात्र आज अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि सेवा-भावी संस्थांच्या योगदानामुळे ही भीती दूर होत असून, अशा शिबिरांमुळे हजारो रुग्णांना नवदृष्टी मिळत आहे. या शिबिराच्या माध्यमातून शहरासह उपनगर व ग्रामीण भागातील नागरिकांनाही मोठा लाभ होत असल्याचे दिसून आले. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी तपासणी करून घेतली असून, मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळत असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# टेल भागाकडे मुळा पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष

## दोन दिवसांत पाणी न मिळाल्यास अमरापूर येथे रस्ता रोको करण्याचा शेतकऱ्यांचा इशारा

**● शेवगाव । वीरभूमी –**
मुळा पाटबंधारे विभागाअंतर्गत मुळा उजवा वितरिका क्रमांक ३ कलव्यामधून सोडण्यात आलेल्या उन्हाळी आवर्तनात टेलच्या भागाला जाणीवपूर्वक पाण्यापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. अमरापूर उपविभागीय अधिकारी संदीप शेळके यांच्यावर टेल भागाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



वरील भागाकडे पाणी वळवले जात असल्यामुळे टेलच्या भागातील शेतकरी हक्काच्या पाण्यापासून वंचित राहत आहेत. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे पाण्याची पातळी झपाट्याने घटत असून शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेली पिके जळण्याच्या मार्गावर आहेत.

पाणी वाटपासाठी टेल टू हेड हे धोरण असताना देखील आव्हाणे खुर्द, वडूले, अमरापूर, फलकेवाडी, भगूर या भागाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची तक्रार आहे.

पाणी प्रश्न हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असून याकडे लोकप्रतिनिधी-आमदार, खासदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

दरम्यान, येत्या दोन दिवसांत पाणी न आल्यास अमरापूर येथे आव्हाणे खुर्द, शहापूर, फलकेवाडी व अमरापूर येथील ग्रामस्थांच्या वतीने रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

हा इशारा सद्गुरूआई पाणी वापर संस्थेचे चेअरमन देविदास काकडे, शंकरराव काकडे, संजय भुसारी, चंद्रकांत काकडे, किशोर सोंडे, किसन काकडे, दिलीप भुसारी, अशोक भुसारी, योगेश काकडे, निलेश काकडे, गणेश कमानदार, राजेंद्र काकडे, महादेव कमानदार, संतोष फटांगडे, कोंडीराम आहेर, नारायण लांडे, ऋषी पवार, बंडू औटी आदींनी दिला आहे.

## पारनेर पंचायत समिती अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास कामांमध्ये अनियमितता

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
पारनेर पंचायत समिती अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास योजनेतील कामांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेबाबत ग्रामविकास अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने संताप व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात चौकशी अहवाल सादर होऊन तब्बल १५ महिने उलटूनही संबंधित अधिकाऱ्याचे निलंबन न केल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन तातडीने कारवाई करण्याचे नाशिक विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. अन्यथा २० एप्रिल जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

पारनेर पंचायत समिती अंतर्गत राळेगण थेरपाळ ग्रामपंचायतमध्ये सन २०२२-२३ या कालावधीत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती विकासासाठी विविध कामे मंजूर करण्यात आली होती. मात्र या कामांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात विस्तार अधिकारी (पंचायत) व कनिष्ठ लेखा अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत ग्रामविकास अधिकारी यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासकीय दस्तऐवजांमध्ये फेरफार केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. दि. ६ जानेवारी २०२५ रोजी तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालात संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांचे कृत्य गंभीर स्वरूपाचे असल्याचे नमूद करून तात्काळ सेवेतून निलंबित करण्याची शिफारस करण्यात आली होती.

चौकशी अहवाल प्राप्त होऊनही उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.), जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या विकास कामांमध्ये अनियमितता झाल्यास तत्काळ गुन्हा दाखल होणे अपेक्षित असताना संबंधित अधिकाऱ्याला पाठीशी घातले जात असल्याचा आरोप समितीने केला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या १८ जानेवारी २०१३ च्या परिपत्रकानुसार तक्रारींवर १२ आठवड्यांत कार्यवाही करणे बंधनकारक आहे. तसेच ७ एप्रिल २००५ च्या शासन निर्णयानुसार शासकीय कर्तव्य पार पाडण्यात झालेल्या दिरंगाईबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणे अपेक्षित आहे.

# जिल्ह्यात ८ ते १४ एप्रिल दरम्यान सामाजिक समता सप्ताह साजरा होणार

### सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांची माहिती

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
जिल्ह्यात दि. ८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' विविध प्रबोधनात्मक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

भारतीय संविधानाच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त, महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त, तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्ष व संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी, दि. ८ एप्रिल रोजी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेची प्रत प्रत्येक कुटुंबास वितरित करण्यात येणार असून सप्ताहाचे उद्घाटन करण्यात येईल. दि. ९ एप्रिल रोजी जिल्ह्यातील महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर, महाड चवदार तळे सत्याग्रहावर तसेच मानवी हक्कांवर व्याख्याने आयोजित करण्यात येतील. यासोबतच संत गाडगे महाराज यांच्या कार्यावर आधारित वक्तृत्व, निबंध व लघुनाट्य स्पर्धांचे आयोजन केले जाईल. याच दिवशी प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येईल.

दि. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात पथनाट्याद्वारे सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात येईल.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ११ एप्रिल रोजी जिल्ह्यात विविध स्तरांवर त्यांच्या सामाजिक कार्याचा जागर करणारे कार्यक्रम होणार आहेत. दि. १२ एप्रिल रोजी 'संविधान जागर' उपक्रमांतर्गत संविधान निर्मिती, मूलभूत अधिकार व कर्तव्ये यावर व्याख्याने आयोजित करण्यात येतील. तसेच महिला मेळाव्याच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याची माहिती दिली जाईल. दि. १३ एप्रिल रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रबोधन शिबिर, विद्यार्थ्यांसाठी रक्तदान शिबिर, तसेच वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येईल. याच दिवशी जात पडताळणी कार्यालयामार्फत ऑनलाइन वैधता प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी, दि. १४ एप्रिल रोजी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येईल. यानिमित्त शेतकऱ्यांसाठी दादासाहेब गायकवाड सबलीकरण मेळावा, तसेच महाड चवदार तळे सत्याग्रहावर व्याख्याने आयोजित करण्यात येऊन सप्ताहाचा समारोप होईल.

# परमेश्वराची भक्ती विसरल्याने संकटे वाढली : मौलाना शमसुद्दीन

## कोपरगाव व राहाता तालुक्यांच्या दोन दिवसीय तब्लीगी इज्तेमाची सांगता

**● कोपरगाव । वीरभूमी–**
वर्तमान काळात मानव परमेश्वराची भक्ती विसरून भौतिक साधनांच्या मागे धावत आहे. गरजांपेक्षा अधिक सुखसुविधा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी तो वेळ खर्च करत असून, त्यामुळे परमेश्वराला विसरून जीवन जगत आहे. यामुळेच दैनंदिन जीवनात विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. मानवाने परमेश्वराची प्रार्थना व भक्ती केल्यास संकटे दूर होऊ शकतात, असे प्रतिपादन मौलाना शमसुद्दीन यांनी केले.

तालुक्यातील सुरेगाव येथे राहाता व कोपरगाव या दोन तालुक्यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय तब्लीगी इज्तेमाची सांगता शनिवारी सायंकाळी झाली. यावेळी मौलाना शमसुद्दीन आपल्या प्रवचनात बोलत होते. या कार्यक्रमाला दोन्ही तालुक्यांतील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने खुदा आणि पैगंबर साहेबांच्या आदेशांवर अमल करावा. इस्लाम धर्मातील पाच स्तंभ (अर्कान) आणि दावते तब्लिगचे सहा गुण (सिफात) आचरणात आणल्यास जीवनाचा मार्ग सुकर होतो. वाईट प्रवृत्ती नष्ट होतात.

आजचा माणूस स्वतःचे गुण न पाहता इतरांचे अवगुण पाहण्यात वेळ घालवत आहे. त्याऐवजी प्रत्येकाने स्वतःचे अवगुण ओळखून इतरांमधील गुण पाहावेत, यामुळे जीवन अधिक योग्य मार्गावर जाईल. तसेच प्रत्येकाने खुदाचे बंदे म्हणून एकमेकांशी प्रेमाने व माणुसकीने वागावे आणि लोकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचा समारोप दुआने करण्यात आला.

सदर इस्तेमाला आमदार आशुतोष काळे, नगराध्यक्ष पराग संधान, सरपंच वाल्मीक कोळपे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब कोळपे, कोळपेवाडीचे सरपंच सूर्यभान कोळपे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण शिंदे, उपसरपंच सागर कोळपे, सदस्य महेश कोळपे, कोल्हे कारखान्याचे व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर परजणे, संचालक राजेंद्र कोळपे, ज्ञानेश्वर हाळनोर, चंद्रभान हाळनोर, काळे कारखान्याचे कार्यकारी संचालक बोरनारे, सेक्रेटरी सुनील कोल्हे, पोलीस पाटील इंद्रभान ढोमसे, आदींसह अनेक मान्यवरांनी भेट दिली. सदर इज्तेमा यशस्वी करण्यासाठी कोळपेवाडी, सुरेगाव, शहाजापुर, येथील ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील व तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी अथक परिश्रम घेतले.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## कचरा गाडीवरील सुका कचरा स्थानिक कचरा वेचकांना देण्याची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील कचरा वेचक बांधवांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला असून, कचरा गाडीवरील सुका कचरा स्थानिक कचरा वेचकांना देण्याची मागणी कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर यांच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास येत्या १५ दिवसांत महानगरपालिकेवर आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा समितीचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी दिला आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी कचरा घंटा गाडी वर परप्रांतीय कामगारांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित ठेकेदारामार्फत या कामगारांना नियमित वेतन दिले जात असतानाच, त्याचबरोबर कचरा गाडीवरील सुका कचराजसे की प्लास्टिक, कागद, लोखंडगोळा करून त्याची विक्री केली जात आहे. यामुळे या कामातून दुहेरी उत्पन्न मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका स्थानिक कचरा वेचकांना बसत आहे. सुका कचरा मिळत नसल्याने त्यांचे प्रमुख उत्पन्नाचे साधन बंद झाले असून, अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. कचरा वेचक हे समाजातील अत्यंत दुर्बल घटक असल्याने त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये स्थानिक कचरा वेचकांना सोबत घेऊन कचरा व्यवस्थापन यशस्वीपणे राबवले जात आहे. स्वच्छ पुणे, अवनी कोल्हापूर आणि स्त्री मुक्ती संघटना यांसारख्या संस्थांनी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून प्रभावी कामगिरी केली आहे. या उपक्रमांमुळे संबंधित शहरांमध्ये स्वच्छतेचा स्तर उंचावला असून, कचरा वेचकांना स्थिर रोजगारही उपलब्ध झाला आहे.

## श्रद्धा डोळसे व शुभदा देवकर यांना डिझाईन एक्सलन्स अवॉर्ड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आयडीटी एज्युकेशन, नाशिक या संस्थेमार्फत दशवार्षिक समारंभा निमित्ताने भव्य कार्यक्रमात इंटेरियर डिझायनर कु श्रद्धा डोळसे व सौ शुभदा देवकर या दोघी भगिनींना डिझाईन एक्सलन्स अवॉर्ड देऊन सन्मानित केले. प्रसिद्ध मराठी अभिनेते चिन्मय उदगीरकर यांच्या हस्ते हा सन्मान श्रद्धाने केलेल्या सुंदर इंटेरियर डिझाइन्स व इंटेरियर या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्यसाठी तसेच सौ शुभदा हिने फॅशन डिझायनिंग क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल दोघींचा हा सन्मान या संस्थेने केला. याप्रसंगी आर्किटेक्ट, शिल्पकार व सिने सेट डिझायनर श्याम लोंढे, संस्थेचे संस्थापक प्रा. महेंद्र शेवाळे, सौ स्नेहल शेवाळे उपस्थित आदी मान्यवर होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष लोंढे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सौंदर्य हे आपल्या विचारात आणि कृतीत असते त्याचाच उपयोग करून आपण केलेली डिझाईन, कलाकृती ही बोलत असते. आपली कलाकृती, डिझाईनेच त्या कलाकाराविषयी सांगायला हवे आणि उत्तम इंटरियर डिझायनर, फॅशन डिझायनर आपल्या डिझाइन्स मधूनच वेगळेपण दर्शवितात. त्यांची कलाकृती हीच त्यांचे व्यक्त होण्याचे माध्यम असते. यावेळी अभिनेते उदगीरकर यांनी मार्गदर्शन करताना आधी स्वतः सौंदर्य समजून घ्यावे कारण आपले विचार आपली कृती हेच आपल्या निर्मितीमध्ये परावर्तित झालेली दिसते. त्यामुळे प्रथम स्वतःला कलात्मक आणि सकारात्मक संदेश देत राहा. अभ्यासातील सातत्य आणि नाविन्याचा शोध यातून नक्कीच उत्तम निर्मिती होते.

# सेनापती बापट मल्टीस्टेटच्या ठेवीदारांचा आक्रोश

### आमच्या घामाचा पैसा आम्हाला परत द्या! पारनेरमध्ये ठेवीदार रस्त्यावर, साखळी उपोषणाचा इशारा

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील सहकार क्षेत्रात सध्या विश्वासाला तडा गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सेनापती बापट मल्टीस्टेटमध्ये आपले कष्टाचे पैसे गुंतवलेले हजारो ठेवीदार आज रस्त्यावर उतरले आहेत. पारनेर बाजारतळावर झालेल्या आंदोलनातील मोठी गर्दी आणि ठेवीदारांच्या डोळ्यांतील अश्रू हे केवळ आर्थिक नुकसान नसून एका मोठ्या विश्वासाचा झालेला अंत असल्याचे चित्र दिसून आले.



आंदोलनातसहभागीझालेल्याशेतकरी, कष्टकरी आणि निवृत्तीवेतनधारकांचा एकच सूर होता – आम्ही पतसंस्थेचे आकडे पाहून नाही, तर माजी आमदार विजयराव औटी यांच्या नावावर आणि शब्दावर विश्वास ठेवून आमची आयुष्यभराची पुंजी येथे ठेवली होती. मात्र, दोन वर्षे उलटूनही हक्काचे पैसे न मिळाल्याने सामान्य ठेवीदार हवालदिल झाले आहेत.

छोटे व्यापारी, सरकारी कर्मचारी तसेच व्याजावर संसार चालवणाऱ्या वृद्धांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. ज्या विश्वासाने आम्ही पैसे ठेवले, त्याच विश्वासाने आता संबंधितांनी पुढाकार घेऊन आमचे पैसे मिळवून द्यावेत, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली.

आंदोलनाचे नेतृत्व करणारे राजू औटी यांनी ठेवीदारांच्या भावना मांडताना सांगितले की, गेल्या दोन वर्षांपासून केवळ आश्वासनांपलीकडे काहीही झालेले नाही. त्यामुळे आता ठेवीदारांचा संयम सुटला असून पुढील टप्प्यात खासदार, आमदार, पालकमंत्री तसेच केंद्र शासनाकडे लेखी निवेदने दिली जाणार आहेत. तसेच पारनेर निबंधक कार्यालयासमोर साखळी उपोषण छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

कोणाचे मुलीचे लग्न अडकले आहे, तर कोणाच्या औषधोपचाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. हा केवळ पैशांचा विषय नसून हजारो कुटुंबांच्या जगण्या-मरण्याचा प्रश्न आहे, असे आंदोलकांनी स्पष्ट केले.

गोरगरीब जनतेचा पैसा हा त्यांच्या कष्टाचा घाम आहे. त्यामुळे प्रशासनाने आणि संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी या आक्रोशाची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. अन्यथा, हा संताप मोठ्या जनआंदोलनात परिवर्तित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

'आमच्या ठेवी आम्हाला परत मिळाव्यात' ही एकमेव मागणी घेऊन पारनेरमधील सामान्य नागरिक सध्या न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

## टाकळी ढोकेश्वरमध्ये 'कोटा' दर्जाचे शिक्षण!

### ग्रामीण विद्यार्थ्यांचे डॉक्टर, इंजिनिअर होण्याचे स्वप्न होणार साकार

**● पारनेर । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना वैद्यकीय (NEET) आणि अभियांत्रिकी (JEE) प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी आता पुणे, मुंबई किंवा कोटा यांसारख्या मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज उरलेली नाही. टाकळी ढोकेश्वर आणि पारनेर येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी दर्जेदार अकॅडमी सुरू झाली असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना आता आपल्या घराच्या जवळच राष्ट्रीय स्तराचे शिक्षण मिळणार आहे.या अकॅडमीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे शिकवणारे शिक्षकवृंद. कोटा, नारायणा आणि एलेन यांसारख्या देशातील नामांकित संस्थांमध्ये ८ ते १० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या तज्ज्ञ शिक्षकांची येथे नेमणूक करण्यात आली आहे. फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी आणि गणित या विषयांचे सखोल मार्गदर्शन येथे केले जाते. विशेषतः कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने समजण्यासाठी 'डिजिटल क्लासेस'चा प्रभावी वापर केला जातो, ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत आहे.अकॅडमीने अल्पावधीतच आपले यश सिद्ध केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये या संस्थेच्या तीन विद्यार्थ्यांनी 'गएए मेन' परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये अनुजा वाफारे (कर्जुले हरेश्वर), सोहम झरेकर (कान्हूर पठार), आयुष गायखे (वासुंदे) या विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात अकॅडमीच्या शैक्षणिक दर्जाची चर्चा होत आहे.केवळ ११ वी, १२ वीच नव्हे, तर ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठीही येथे फाउंडेशन कोर्स उपलब्ध आहेत. यात स्कॉलरशिप, NTSE, NMMS आणि नवोदय यांसारख्या स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करून घेतली जाते. इयत्ता १० वीतून ११ वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १३ एप्रिलपासून 'मोफत फाउंडेशन कोर्स' म्हणजेच फ्री डेमो क्लासेसचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दर आठवड्याला 'विकली टेस्ट' घेतली जाते आणि त्याचा निकाल थेट पालकांना पाठवला जातो. या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आजच संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गणेशाचा जन्म म्हणजे आज्ञापालन आणि मातृशक्तीचा अद्भुत संदेश : स्वामी विश्वनाथगिरी महाराज



**● कोपरगाव । वीरभूमी–**

माता पार्वती यांनी स्वतःच्या शक्तीतून गणपतीची निर्मिती केली. यावरून आईचे सामर्थ्य आणि सृजनशक्ती किती महान आहे हे स्पष्ट होत असल्याचे प्रतिपादन स्वामी विश्वनाथगिरी महाराज यांनी तालुक्यातील मौजे काकडी येथे सुरू असलेल्या शिवमहापुराण कथे प्रसंगी केले आहे.

ते पुढे विवेचन करताना म्हणाले की, गणपतीने आपल्या आईची आज्ञा पाळण्यासाठी स्वतःचे प्राणही पणाला लावले. हे दाखवते की कर्तव्य आणि आज्ञापालन हे जीवनातील सर्वोच्च मूल्य आहे.

भगवान शिव आणि गणपती यांच्यातील प्रसंगातून अहंकाराचे दुष्परिणाम दिसतात. शेवटी शांततेनेच प्रश्न सुटतो हा संदेश मिळतो.

गणपतीचे शिर बदलून त्याला नवजीवन देण्यात आले. यावरून संकटानंतरही नवीन सुरुवात होऊ शकते, हा सकारात्मक संदेश दिला आहे.तसेच भगवान शिवांनी गणपतीला सर्वप्रथम पूजनीय देवता घोषित केले. याचा अर्थ कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी अडथळे दूर करण्यासाठी श्रद्धा आणि योग्य प्रारंभ आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी साथ संगत अजय महाराज तुपे, संदीप महाराज वैद्य यांनी केली तर शिवसेनेचे मा. तालुका प्रमुख शिवाजी ठाकरे, वसंत महाराज भाकरे, सुनील काजळे, अंजनापूरचे सरपंच ज्ञानेश्वर गव्हाणे आदीसह कथा ऐकण्यासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी परिसरातील हजारो भाविक उपस्थित होते.

# शेतरस्त्यांच्या लढ्याला नवे बळ, ग्रामसीमा सुरक्षेलाही नवी दिशा

### शरद पवळे । शिव पाणंद चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन मढीत उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील श्रीक्षेत्र चैतन्य कानिफनाथ देवस्थान, मढी येथे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात पार पडले. देवस्थान ट्रस्टच्या सहकार्याने आयोजित या अधिवेशनाला राज्यभरातून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहिले होते.

सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चाललेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष पुणे उपजिल्हाधिकारी गणेश मरकड होते. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे निवासी तहसीलदार किशोर सानप, राज्य उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे, राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे, ज्येष्ठ नेते पोपट शेळके, अशोक कचरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल निर्मळ यांनी केले.

प्रास्ताविकात चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी देवस्थान ट्रस्ट, उपस्थित अधिकारी व राज्यभरातून आलेल्या शेतकरी बांधवांचे आभार मानले. राळेगणसिद्धी-नारायणगव्हाण येथून सुरू झालेल्या शिव पाणंद चळवळीला पारनेर येथील आंदोलनानंतर अधिक गती मिळाली. पेरू वाटप आंदोलन, न्यायालयीन लढे तसेच विविध जनजागृती उपक्रमांमुळे शासनाचे लक्ष वेधले गेले आणि महत्त्वपूर्ण शासननिर्णय मिळवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना पवळे म्हणाले, राज्यभर शासननिर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना प्रशासकीय व न्यायालयीन संघर्षातून मुक्त करणे आणि दर्जेदार शेतरस्त्यांचे स्वप्न पूर्ण करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. शिव पाणंदमुळे ग्रामविकासासोबत ग्रामसीमा सुरक्षेलाही नवी दिशा मिळत आहे. अध्यक्षीय भाषणात उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांनी शेतकऱ्यांसाठी रस्ते खुले करताना आलेले अनुभव सांगून मार्गदर्शन केले. तसेच इतर अधिकाऱ्यांनी व चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनीही आपले अनुभव मांडत उपस्थित शेतकऱ्यांना प्रेरणा दिली.

या अधिवेशनास पोपट शेळके, विठ्ठल निर्मळ, अशोक कचरे, रविंद्र खुडे, सुरेश वाळके, बाळासाहेब थोरात, राजाभाऊ नागवडे, सचिन शेळके, विजय शेलार, शांताराम



# भगवानगडाच्या सप्ताहात भक्ती, शिस्त आणि अध्यात्माचा अद्वितीय संगम

## ९२ व्या नारळी सप्ताहाची भव्य सांगता । महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या प्रभावी कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध

**● पाथर्डी । वीरभूमी–**

भक्तीरसात न्हाऊन निघालेला जनसागर, अध्यात्मिक ज्ञान देत समाजातील अनिष्ट प्रथांवर आसूड ओढणारे महंतांचा सप्ताहातील उपदेश, आणि भगवानगडाला धर्मज्ञानपीठाबरोबरच शक्तीपीठ म्हणून भाविकांनी दिलेली मान्यता– या सर्वांच्या साक्षीने भगवानगडाच्या ९२व्या नारळी सप्ताहाची बडेवाडी येथे संत-महंत व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य सांगता झाली.

सप्ताहाच्या सांगतेला वारकरी संप्रदायिकांसह भगवान भक्तांच्या भक्तीप्रदर्शनाने संपूर्ण तालुका भारावून गेला. गडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांचा प्रति ज्ञानेश्वर असा उल्लेख होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली.

तालुक्यातील या सप्ताहाच्या सांगतेसाठी माजी मंत्री धनंजय मुंडे, खासदार निलेश लंके, आमदार मोनिका राजळे, ॲड. प्रताप ढाकणे, प्रभावती ढाकणे, बाळासाहेब आजबे, ज्येष्ठ कार्यकर्ते दादासाहेब मुंडे, बाळासाहेब सानप, प्रा. लक्ष्मण हाके, राधाताई सानप महाराज, रामगिरी महाराज, गडाचे उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांच्यासह बीड व अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित होते.

पाथर्डी आगाराने यंदा प्रथमच



सप्ताहासाठी जादा बसेस उपलब्ध करून दिल्या. सोमवारी रात्री महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराजांच्या कीर्तनाला ऐतिहासिक गर्दी जमली.

यावेळी बोलताना शास्त्री महाराज म्हणाले, वारकरी संप्रदायाने अंधश्रद्धा कधीही जोपासली नाही. आतापर्यंत गडाला तीन मुख्यमंत्र्यांनी भेट देऊन विकासकामांना सहकार्य केले आहे. ऊसतोड कामगारांनी कष्ट करून गडावरील ज्ञानेश्वर मंदिराच्या दगडी कामासाठी १३ कोटी रुपये दिले, तर धनंजय मुंडे यांनी दोन कोटी रुपये दिले आहेत.

चार कोटी रुपयांचे अत्याधुनिक महाप्रसादगृह लवकरच सुरू होणार असून गडाचा इतिहास आणि अध्यात्मिक परंपरा नव्या पिढीने अभ्यासपूर्वक जाणून घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

वारकरी संप्रदाय हा समाजाचा दिशादर्शक असून भगवान बाबांनी त्यांच्या जीवनकार्याद्वारे समाजाच्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक आणि धार्मिक उन्नतीसाठी आयुष्य वेचले. त्यामुळेच त्यांच्या विचारांचे अनुयायी समाधानी जीवन जगत आहेत. भगवानगड हीच धार्मिक विचारांची चळवळ भविष्यात अधिक व्यापक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

धनंजय मुंडे म्हणाले, शंभर घरांचे बडेवाडी गाव एवढ्या भव्य प्रमाणात सप्ताहाचे यशस्वी आयोजन करते, हाच भगवान बाबांचा चमत्कार आहे. लाखो लोक शिस्तीत आणि महंतांच्या आदेशानुसार वागताना फक्त या सप्ताहात दिसतात.

नामदेव शास्त्री यांचे ज्ञानेश्वरीवरील सखोल आणि चिकित्सक निरूपण त्यांना ज्ञानाचे ऐश्वर्य प्राप्त करून देते. देशात त्यांच्या मुखातून ज्ञानेश्वरी ऐकण्याचा मान वेगळाच आहे. भगवानगडावरील संत ज्ञानेश्वरांचे भव्य मंदिर जगात अद्वितीय ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

वारकरी संप्रदायाने कधीही अंधश्रद्धा जोपासली नाही. निर्मळ व स्वच्छ भक्ती हीच श्रेष्ठ ठरते. हीच शास्त्रीजींची शिकवण आहे. अध्यात्माच्या माध्यमातून भगवानगडाने विशेषतः शास्त्रीजींनी संपूर्ण राज्याला व राज्यातील ग्रामीण भागाला दिशा दिली. सर्वांचे प्रेरणास्थान म्हणून गड नावारूपाला आणण्यात शास्त्रीजींनी मिळवलेले यश ही सुद्धा भगवान बाबांची कृपा शक्ती आहे. वसु जळगाव येथे पुढील वर्षी होणाऱ्या सप्ताहाला जास्तीत जास्त वेळ उपस्थित राहण्याचा आपण प्रयत्न करू. शास्त्रीजींचा सहवास ऊर्जा प्रदान करणारा व मनःशांती देणारा ठरतो.

ॲड. प्रतापराव ढाकणे यांनी शास्त्री महाराजांच्या विद्वत्तेचे कौतुक करत राज्याला त्यांच्या नेतृत्वाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. गड आता स्वयंपूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले.

### शास्त्रींचा मोलाचा उपदेश

■ महंत डॉ. नामदेव शास्त्री यांनी अध्यात्मिक क्षेत्रातील भोंदूगिरीवर टीका करत भाविकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले. अंधश्रद्धा ठेवू नका, शिका, विचार करा–ज्ञानच तुम्हाला तारेल, असा संदेश त्यांनी दिला. भक्ती, शिस्त, सेवा आणि अध्यात्मिक उर्जेचा संगम असलेल्या या सप्ताहाने लाखो भाविकांना अंतर्मुख करत नवचैतन्य दिले.

### कुटुंबप्रमुख म्हणुन माझी जबाबदारी : मुंडे

■ सांगता कार्यक्रमासाठी धनंजय मुंडे आणि बाळासाहेब सानप हेलिकॉप्टरने आले. जेसीबीमधून झालेल्या फुलवृष्टीने वातावरण भारावून गेले. गोपीनाथ मुंडे यांच्या कुटुंबीयांची अनुपस्थिती लक्षात घेऊन शास्त्री महाराजांनी त्यांच्या योगदानाचा उल्लेख केला. त्यावर धनंजय मुंडे यांनी कुटुंब प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारत भूमिका स्पष्ट केली.

### बडेवाडीकरांची अडचणींवर मात

■ सुरुवातीचे दोन दिवस अवकाळी पावसाने सप्ताहामध्ये मोठे अडथळे आले. बडेवाडीसह पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी अत्यंत परिश्रम करत संपूर्ण सेट अप पुन्हा उभा केला. रखरखत्या उन्हातही सांगता समारंभासाठी हजारो भाविकांनी एलईडी वॉलवर कार्यक्रम बघितला. भगवान बाबांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमला. उत्साह, चैतन्य, श्रद्धा व सेवेचे दर्शन आज लाखो भाविकांना घडले. भाविकांना महाप्रसाद वाटपासाठी २२ ट्रॅक्टर पंगतीमध्ये फिरत होते.

# सकारात्मक जीवनशैली घडविणासाठी खेळाचे जीवनात अनन्य साधारण महत्त्व : सुमित कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

व्यस्त जीवनशैलीतून माणसिक ताजेपणा मिळविण्यासाठी आणि अडचणींना सामोरे जाण्याची ताकद निर्माण करण्यासाठी खेळासारखा उत्तम पर्याय दुसरा नाही. खेळातुन सांघिक भावना वाढीस लागुन एकोपा निर्माण होतो. म्हणुन सकारात्मक जीवनशैली घडविणासाठी खेळाचे जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे, असे उद्गार संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी काढले.

कोपरगांव तालुक्यातील शिक्षकांमध्ये क्रीडावृत्ती, उत्साह आणि एकोप्याची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या कोपरगाव गुरुजी प्रीमियर लीग २०२६ या क्रिकेट स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा नुकताच तालुका क्रीडा संकुल, टाकळी फाटा येथे,



संजीवनी अकॅडमी परिसरात मोठ्या जल्लोषात पार पडला. या उद्घाटन सोहळ्यात माजी सभापती सुनील देवकर हे समवेत उपस्थित होते.

श्री. कोल्हे पुढे म्हणाले की, शिक्षकांसारख्या समाजघटकांसाठी अशा स्पर्धा केवळ मनोरंजनापुरत्या मर्यादित नसून, त्या आरोग्यदायी व सकारात्मक जीवनशैली घडविणाऱ्या ठरतात. यावेळी त्यांनी संजीवनी परिवाराची सामाजिक बांधिलकी अधोरेखित केले.

स्पर्धेदरम्यान लागणाऱ्या वैद्यकीय सुविधांसाठी संजीवनी आयुर्वेद कॉलेज हॉस्पिटल तसेच संपूर्ण संजीवनी शिक्षण संस्था सज्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी त्यांनी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या आठवणींना उजाळा दिला. या मैदानावर स्वतः स्व. कोल्हे उपस्थित राहून त्यांनी केलेल्या वृक्षारोपण व संगोपनाची आठवण सांगताना, आज या झाडांची सावली म्हणजे जणू त्यांचे आशीर्वादच असल्याची भावनिक भावना त्यांनी व्यक्त केली.

या सामन्यांमध्ये प्रथम, द्वीतिय, तृतिय व चतुर्थ विजेत्या संघास अनुक्रमे रू ७१०१,रू ५१०१, रू ३१०१ व रू २१०१ अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहे. मालीका विरास रू ११०० चे बक्षिस आहे. तसेच सर्वाधिक चौकार, उत्कृष्ट गोलंदाज, उत्तम संघ, सर्वाधिक षटकार, उत्कृष्ट झेल, हॅटट्रीक, उत्कृष्ट यष्टीरक्षक, अष्टपैलु खेळाडू सामनावीर अशा वर्गवारीतील खेळाडूंना प्रत्येकी रू ५०० व ट्रॉफी बक्षिस देण्यात येणार आहे.

याप्रसंगी किरण निंबाळकर, मनोहर शिंदे, महेंद्र विधाते, रमेश दरेकर, शशिकांत जेजुरकर, माणिक कदम, मनोज सोनवणे, विद्या आढाव, सुनील पोरे, दिपक तुंगार, राहुल भागवत, विलास गवळी, चंद्रविलास गव्हाणे, अमोल कडू, मारुती भोईर, सुधाकर निकुंभ, संजय साबळे, नारायण कवडे, गोविंद आढळ व मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# श्री रेणुकामाता जन्मोत्सव सोहळा जल्लोषात साजरा

## श्रीक्षेत्र अमरापूर येथील देवस्थानात भाविकांची उत्स्फूर्त हजेरी

**● शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव तालुक्यातील श्री क्षेत्र अमरापूर येथील रेणुका माता देवस्थानात मंगळवार, दि. ७ एप्रिल चैत्र कृष्ण पंचमीला श्री रेणुकामातेचा जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला.

मंगळवारी प्रातःसमयी रेणुका आईसाहेबांना दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर भरजरी शालू व सुवर्णालंकारांनी मातेचा आकर्षक श्रृंगार करण्यात आला. मंदिराच्या गाभाऱ्यात असंख्य तेलतुपाचे दिवे लावून झगमगाट करण्यात आला. सकाळी ११:३० वाजता महाआरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी दिवसभर महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

श्री रेणुकामाता मल्टीस्टेटचे प्रवर्तक व ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव यांनी पूजाविधी केला. तसेच रेणुकामाता भक्तानुरागी मंगलताई



भालेराव व जयंती भालेराव यांनी आईसाहेबांचे औक्षण केले. देवस्थानचे पुजारी तुषार देवा व अन्य ब्रह्मवृंदांनी पौरोहित्य केले.

दिवसभर पंचक्रोशीतील भाविकांनी आईसाहेबांच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, माजी नगराध्यक्षा जनाबाई घोडके, श्रीमंत घुले, प्रा. जनार्दन लांडे पाटील, डॉ. अरविंद पोटफोडे, गणेश मोरे, सचिन भारस्कर, राजेंद्र चव्हाण, बाळासाहेब चौधरी, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, एकनाथ कुसळकर, महादेव दळे, अनिल साठे, रामनाथ रुईकर, दादा डोंगरे, राहुल वाघमारे, नंदकुमार डाळींबकर आदींसह अनेक भाविकांनी उपस्थिती लावली. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची वर्दळ सुरू होती.

# भिमसैनिक नितीन शिरसाठ खूनप्रकरणी आरोपींना अटक करा

## मोक्का कारवाईची मागणी । स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भिमसैनिक नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खूनप्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

या उपोषणात रिपब्लिकन पक्ष (गवई) चे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संपदा म्हस्के, प्रतीक बारसे, विजय शिरसाठ, ज्योती पवार, निलेश शिरसाठ, प्रतीक शिरसाठ, शशिकांत गायकवाड, सोनू जाधव, तात्या शिरसाठ, भावड्या कुऱ्हाडे, विक्रम आंग्रे, राकेश आल्हाट, संतोष लोंढे, प्रवीण गायकवाड, सुजय पाटोळे, विशाल गायकवाड आदींसह अनेक समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

या घटनेतील आरोपींना राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, आरोपींचे अचूक लोकेशन वारंवार पोलिसांना देऊनही त्यांना अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोपींना राजकीय दबावातून वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, या प्रकरणातील तपासाबाबत पारदर्शकता राखावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, या आरोपींवर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, ते सराईत गुन्हेगार असल्याचे पुरावे पोलीस प्रशासनाला सादर करण्यात आले असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. असे असतानाही दीड महिन्यांहून अधिक काळ लोटूनही अटक न होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणाचे तपास अधिकारी यांनी आतापर्यंत नेमका काय तपास




केला, किती पथके तयार करण्यात आली, याबाबतची सविस्तर माहिती फिर्यादीला तात्काळ द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच, या प्रकरणाचा तपास निर्भीड आणि सक्षम अधिकाऱ्याकडे सोपवून आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे.